**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. राजेश जर्नादन बंडगर,
ए-१०, पंधारकर पार्क, सिध्देश्वररोड,
सोलापूर-४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, दक्षिण सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत बोरामणी,ता. दक्षिण सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६५/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. राजेश जर्नादन बंडगर, ए-१०, पंधारकर पार्क, सिध्देश्वररोड, सोलापूर-४

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर श्री. बी.एम.वासुदेव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत बोरामणी,ता. दक्षिण सोलापूर श्री. डी.बी.बिराजदार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००५ |
| ६- | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.३.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे बोरामणी येथील नमुना नं.८ चा उतारा यास अनुक्रम नंबर ५७९ यास केशव गुंडा बंडगर यांचे नाव कमी करुन श्री. गुंडा निवृत्ती बंडगर यांचे नाव बोगस वारसदार म्हणून नोंद केलेबाबत तक्रार अर्ज, पंचनामा व जबाब, कारवाई आदेश यांचे नकला, दि. ६.७.२००५, १७.११.२००५ व दि. १४.३.२००६ चे अर्ज यानुसार योग्य माहिती मिळाली नाही, ती मिळावी

## विवेचन

मौजे बोरामणी येथील नमुना क्र.८ चा उतारा अ.क्र.५७९ यात श्री.केशव गुंडा बंडगर यांचे नाव कमी करुन श्री.बंडा निवृत्ती बंडगर यांचे नाव बोगस वारसदार म्हणून नोंद केल्याबाबतचा तक्रार अर्ज, पंचनामा, जबाब व कारवाईचा आदेश यांच्या नकलांची मागणी अपीलकर्ता श्री.राजेश जनार्दन बंडगर यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत बोरामणी, ता.दक्षिण सोलापूर यांच्याकडे केली होती. त्यातील प्रती जन माहिती अधिकाऱ्यांकडून, तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून न मिळाल्यामुळे श्री.बंडगर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.बंडगर यांचा मूळ प्रश्न वारसाहक्काशी संबंधित - वारस नोंद करण्याचा व वाटणी नोंदीबाबतचा आहे. श्री.बंडगर यानी हा विषय विविध अधिकाऱ्यांकडे वेगवेगळ्या माध्यमातून माडला आहे. परंतु माहितीच्या अधिकारात त्यांनी मागितलेली माहिती कागदपत्रांच्या प्रतीच्या स्वरुपाची आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर देण्याऐवजी त्यांच्या अर्जाला अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी यांनी उत्तर दिले. त्यात वारसाची नाव नोंदणी करण्याबाबतच्या

विषयाचा व श्री.राजेश जनार्दन बंडगर आणि श्री.गुंडा निवृत्ती बंडगर यांच्यामध्ये न्यायालयात सुरु असलेल्या दाव्याचा संदर्भ गट विकास अधिकारी यांनी दिला आहे. ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे न्यायालयाच्या निकालानंतरच पुढील कार्यवाही करणे उचित होईल, असे नमूद करुन त्यांनी श्री.बंडगर यांचा अर्ज निकाली काढला आहे.

श्री.बंडगर यांच्या अपिलावर आयोगाने दि.५.९.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. श्री.बंडगर सुनावणीला उपस्थित नव्हते. आपल्याला हवी असलेली माहिती मिळाल्यामुळे आपली काहीही तक्रार राहिलेली नाही, असे गट विकास अधिकाऱ्याना श्री.बंडगर यांनी सादर केलेले निवेदन त्यांनी फॅक्सव्दारे आयोगाला पाठविले. तसेच तंटामुक्त गाव योजनेत बंडगर बंधूंचा तंटा मिटला असल्यामुळे आता हा प्रश्न राहिलेला नाही, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत,बोरामणी, ता.दक्षिण सोलापूर श्री.डी.बी.बिराजदार व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर श्री.बी.एम.वासुदेव यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. तशा स्वरुपाच्या वृत्तपत्रातील बातमीचे कात्रणही त्यांनी सादर केले.

आपल्याला काही कागदपत्रे मिळाली असून संपूर्ण माहिती देण्यात आली नाही. तक्रार नसल्याचे आपल्याकडून दबावाखाली लिहून घेतले आहे, अशी तक्रार श्री.बंडगर यांनी नंतर आयोगाकडे लेखी व तोंडी केली. त्यामुळे दि.२९.९.२००७ रोजी या अपिलाची पुन्हा सुनावणी घेण्यात आली. घराच्या नोंदीवर वारसा हक्काने नाव लावणे हीच मुख्य मागणी असल्याचे श्री.बंडगर यांच्या निवेदनातून स्पष्ट झाले. आपल्यावर दबाव आणून तक्रार नसल्याचे लिहून घेतल्याचा आरोप त्यांनी केला. परंतु ते तो सिध्द करु शकले नाहीत. उपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या आरोपाचा इन्कार केला. श्री.बंडगर यांनी मागितलेली काही कागदपत्रे सन १९६५ सालाची आहेत, ती उपलब्ध नाहीत, त्यामुळे देता आली नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र तंटामुक्त गाव योजनेत हा प्रश्न सोडविण्यात आला असून श्री.बंडगर यांच्या मूळ मागणीची पूर्तता करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) ऊर्वरित कागदपत्रांचा शोध घेऊन व अपीलकर्त्यास अभिलेखाचे सर्वेक्षण करु देऊन आवश्यक ती कागदपत्रे द्यावीत, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक २५.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १०.१२.२००७**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय बाळासो पाटील
जुनी ई ८ / १, वसंतदादा शे.स.सा.का. लि. सांगली,
ता. मिरज, जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,
माजी सैनिक शिक्षण संस्था खरकटवाडी,
ता. मिरज, जि. सांगली

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
कै.पद्म. डॉ. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय,
खरकटवाडी, ता. मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.२.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.३.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.३.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.४.२००७ |

६ **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

कै. पद्म. डॉ. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय, खरकटवाडी, ता. मिरज, जि. सांगली येथील दि. ३० जून १९९९ अखेर शाळा सोडलेल्या मुलांच्या दाखल्याच्या झेरॉक्स प्रती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय बाळासो पाटील, रा. जुनी ई ८/१, वसंतदादा शे.स.सा.का. लि., सांगली, ता. मिरज, जि. सांगली यांना लिपिक पदावरुन व त्यांच्या पत्नीला माजी सैनिक शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांनी दि. १.७.१९९९ पासून तोंडी आदेशाने सहाय्यक शिक्षिका या पदावरुन कमी केले होते. त्या विरोधात त्यांनी शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर येथे रितसर अपील दाखल केले होते. तसेच केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक कै. पद्म. डॉ. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय, खरकटवाडी, यांचेकडे दि. १२.२.२००७ रोजी माहिती मागणारा अर्ज दाखल केला होता. जन माहिती अधिकाऱ्याने दि. १.३.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्री. पाटील यांनी सचिव, माजी सैनिक शिक्षण संस्था, खरकटवाडी, ता. मिरज, जि. सांगली यांच्याकडे दि. १३.३.२००७ रोजी अपील दाखल केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या दि. ३.४.२००७ च्या आदेशाने समाधान न झाल्याने श्री. पाटील यांनी दि. २३.४.२००७ रोजी आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. पाटील यांनी शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर या न्यायालयाच्या निकालामुळे आपले समाधान झाले असल्याने आता आयोगाकडील अपिलाप्रमाणे माहिती नको आहे, असे दि. ७.११.२००७ रोजीच्या अर्जान्वये आयोगास कळविले आहे. दरम्यानच्या काळात आयोगाने संस्थेकडून अहवाल मागितला असता अपीलकर्त्यास पुन्हा कामावर घेण्यात आले असल्याचे सचिव, माजी सैनिक शिक्षण संस्था खरकटवाडी, ता. मिरज, जि. सांगली यांनी कळविले आहे.

वरील विवेचन विचारात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १.१२.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.के.व्ही.राजू
रा.सी /२४, रेल रेसिडेन्सी सोसायटी लि.,
सेक्टर ३०/३१, बिजलीनगर, आकुर्डी, पुणे-४११३३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड
नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर २४, निगडी, पुणे -४४ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य रचनाकार, पिंपरी चिंचवड
नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर २४, निगडी, पुणे -४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.के.व्ही.राजू, रा.सी /२४, रेल रेसिडेन्सी सोसायटी लि.
सेक्टर ३०/३१, बिजलीनगर, आकुर्डी, पुणे-४११३३

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य रचनाकार, पिंपरी चिंचवड
नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर २४, निगडी, पुणे -४४
प्रभारी मुख्य रचनाकार श्री.अनिल शंकर काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पत्र क्र.२५७७, दि.२४.३.२००४ ची प्रत. भारतीय रेल्वे कल्याण संस्थेला रेल्वे कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्थेसाठी दिलेल्या भूखंडाचे तसेच सोसायट्यांमधील प्लॉटस्चे विभाग करता येतात का? करता येत असतील तर त्याचा येणारा खर्च. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातील सेक्टर ३०/३१ मधील कन्वेयन्स प्रपोजल बिल्डरने आजतागायत आपल्या कार्यालयात सादर केलेले नाही, याबाबत आजची परिस्थिती. या सेक्टरबाबतचे नकाशे, करारपत्र, बिनशेती आदेश इ.च्या प्रती. |

## विवेचन

रेल्वे कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्थेसाठी भारतीय रेल्वे कल्याण संस्थेला दिलेल्या भूखंडाच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.के.व्ही.राजू यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्य रचनाकार, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्याकडे माहिती मागितली होती. पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, . पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्याकडे अपील केले. परंतु त्यानंतरही माहिती न मिळाल्यामुळे श्री.राजू यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. त्याची सुनावणी दि.६.८.२००७ रोजी निश्चित करण्यात आली होती. परंतु उत्तरवादी उपस्थित न राहिल्यामुळे दि. ११.१२.२००७ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. दरम्यानच्या काळात आपल्याला माहिती मिळाली असून आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, तसेच माहितीचे स्वरुप लक्षात घेता संबंधित अधिकाऱ्यांच्या विरुध्द शास्ती अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाची कारवाई करु नये अशी आपली विनंती आहे, असे श्री.राजू यांनी आयोगापुढील सुनावणीत तोंडी व लेखी नमूद केले.

## आदेश

अपीलकर्त्याची तक्रार राहिलेली नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. १३.१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.इब्राहिम इस्माईल तडकल
रा.६५२, साखरपेठ, सोलापूर-०५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद
श्री.जिवाजी बाबुराव बागुल

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>शासन निर्णयानुसार आपण जिल्हा परिषद, नगरपालिका, खाजगी १ ते ७ प्राथमिक शाळेत किती कला शिक्षकांना मान्यता दिल्या आहेत. प्राथमिक १ ते ७ शाळेत शैक्षणिक वर्षानुसार म्हणजे १९९८ ते २००४ वर्षवार किती कला शिक्षकांना मान्यता दिली. शासन निर्णय दि.२९.१०.२००४ चे आदेश अंमलात येण्याअगोदर किती कला शिक्षकांना मान्यता दिली, औरंगाबाद जिल्हा परिषद हद्दीतील प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा जोडून आहेत की वेगवेगळ्या आहेत याची माहिती. सन १९७३ ते २००५ या कालावधीतील. |

## विवेचन

औरंगाबाद जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळांमध्ये कला शिक्षकांना दिलेल्या मान्यतेबाबत अपीलकर्ता श्री.इब्राहिम इस्माईल तडकल यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे माहितीची मागणी केली होती. ती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे अपील केले. दोन स्मरणपत्रे पाठवूनही त्यांनी अपिलाची दखल घेतली नाही म्हणून श्री.तडकल यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.९.८.२००६ (प्राप्त दि.१९.८.२००६) रोजी अपील केले आहे. त्यानंतर दि.१५.९.२००६ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.तडकल यांना हवी असलेली माहिती पुरविली. म्हणजे मूळ अर्ज केल्यापासून जवळजवळ चार महिन्यांनी माहिती दिली गेली. ही माहिती दि.३१.६.२००६ रोजीच पाठविली होती, श्री.तडकल यानी ती मिळाली नसल्याचे राज्य माहिती आयोगाच्या पत्रावरुन कळल्यामुळे त्याची फेरप्रत त्यांना पाठविण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद श्री.जिवाजी बाबुराव बागुल यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंमलात आल्यानंतरच्या प्रारंभीच्या काळातील हा अर्ज असल्यामुळे कायद्याची पूर्ण माहिती नसल्यामुळे प्रक्रियेत त्रुटी राहिल्या, तसेच सन १९७३ ते २००५ एवढ्या प्रदीर्घ काळातील माहिती मागितली होती, त्यामुळे विलंब लागला, असे स्पष्टीकरण श्री.बागुल यांनी दिले. विलंबाबाबत संबंधितांना कडक समज देण्यात यावी, असे श्री.तडकल यांनी सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) विलंबाबाबतचे अपिलीय प्राधिकारी यांचे स्पष्टीकरण मान्य करुन विलंब क्षमापित करण्यात येत आहे. मात्र स्मरणपत्रे पाठवूनही प्रथम अपिलाची दखल न घेतल्याबद्दल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद श्री.जिवाजी बाबुराव बागुल यांना समज देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २०.१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विकास भिमराव गायकवाड
मु.पो.वडापूरी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मझदा बिल्डींग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
बांधकाम उपविभाग, इंदापूर(मार्केट कमिटी), जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विकास भिमराव गायकवाड
मु.पो.वडापूरी, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मझदा बिल्डिंग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे श्री.प्र.ना.माने

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
बांधकाम उपविभाग, इंदापूर(मार्केट कमिटी), जि.पुणे श्री.महेश सुग्रीव रसाळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.७.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग, इंदापूर (मार्केट कमिटी) कार्यालयाकडे आलेले तक्रारी अर्ज, महाराष्ट्र माहिती अधिकार व केंद्रिय माहिती अधिकाराखालील अर्ज, अपील अर्ज, त्यावरील केलेल्या कारवाईची प्रत. कार्यालयातील कर्मचारी यांच्या मत्ता, दायित्व प्रपत्राच्या छायांकित प्रती, उद्भव नसताना पाणीपुरवठा चालू करण्यात आलेल्या स्कीमबद्दल माहिती, सर्व अधिकारी व कर्मचारी तालुका/जिल्हा स्तर प्रवासभत्ते बिलाची माहिती, व्यवस्थापनावरील खर्च, तीन वर्षे एकाच कार्यालयात काम केलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती, त्यांची नांवे इ. माहिती पाहण्यासाठी व पाहिल्यानंतर मिळणेसाठी |

## विवेचन

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे चालू असलेल्या व बंद कामांची माहिती अपीलकर्ता श्री.विकास भिमराव गायकवाड यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग, इंदापूर(मार्केट कमिटी), जि.पुणे यांच्याकडे मागितली होती. त्यासाठी आवश्यक ते शुल्क रु.७०९०/- भरणा करण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. आपण दारिद्र्यरेषेखाली असून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार शुल्क आकारता येणार नाही, निःशुल्क माहिती दिली पाहिजे, असे श्री.गायकवाड यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना कळविले. श्री.गायकवाड यांनी जन माहिती अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार दिलेला दारिद्र्यरेषा दाखला सन १९९७-९८ चा असून त्यांच्या वडिलांच्या नांवे आहे. एकत्रित कुटुंब असल्यामुळे आपण दारिद्र्यरेषाखाली असल्याचे श्री.गायकवाड यांचे म्हणणे आहे. परंतु श्री.गायकवाड स्वतः सज्ञान असल्याने त्यांच्या नावाचा स्वतंत्र दाखला आवश्यक असल्याचे उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी त्यांना कळविले. असा दाखला त्यांनी सादर न केल्यामुळे त्यांनी स्वतः दारिद्र्यरेषाखाली असल्याचा दाखला दिल्यास त्यांना विनाशुल्क माहिती द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दिला. या संदर्भात वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार करण्यात येत असून आपण दारिद्र्यरेषाखाली असल्याबद्दल निर्णय मान्य झाल्यास माहिती विनामूल्य देण्यात येईल, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.गायकवाड यांना कळविले. या निर्णयासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असून माहिती

तात्काळ हवी असल्यास शुल्क रुपये ७०९०/- भरुन घ्यावी, वरिष्ठ कार्यालयाचा निर्णय आपल्या बाजूने लागल्यास आपण भरलेले शुल्क परत दिले जाईल, असेही अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.गायकवाड यांना कळविले. श्री.गायकवाड यांनी रक्कम भरली नाही व दारिद्र्यरेषा दाखलाही सादर केला नाही. त्यामुळे संबंधित माहिती त्यांना देण्यात आली नाही, असे जन माहिती अधिकारी श्री.महेश सुग्रीव रसाळ व अपिलीय प्राधिकारी श्री.प्र.ना.माने यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. या संदर्भात श्री.गायकवाड यांना वारंवार पाठविलेली स्मरणपत्रे व वरिष्ठ पातळीवर केलेला पत्रव्यवहार यांच्या प्रती त्यांनी सादर केल्या. श्री.गायकवाड यांनी स्वतः दारिद्र्यरेषाखाली असल्याचा सन २००२-२००७ चा ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत, वडापूरी यांचा दाखला सुनावणीदरम्यान सादर केला. त्यानुसार संपूर्ण माहिती त्यांना त्वरित व निःशुल्क दिली जाईल, असे अपिलीय प्राधिकारी श्री.प्र.ना.माने यांनी सांगितले. त्यानुसार दि.१२.१२.२००७ रोजी त्यांना माहिती पुरविल्याचे श्री.माने यांनी आयोगाला कळविले.

श्री.गायकवाड हे 'रिपब्लिक न्यूज ' या साप्ताहिकाचे मालक व संपादक असून त्यांचा दूरध्वनी कागदपत्रात नमूद आहे. तसेच त्यांच्याकडे भ्रमणध्वनी आहे. या पार्श्वभूमीवर दारिद्र्यरेषेखालील सवलतींचा लाभ घ्यावा का, याचा श्री.गायकवाड यांनी स्वतः विचार करावा. तसेच अशा दाखल्यांबाबत काटेकोरपणे छाननी संबंधित अधिकाऱ्यांनी करणे गरजेचे आहे.

अपीलकर्त्याच्या दारिद्र्यरेषेखालील दाखल्याबाबतच्या परिस्थितीमुळे माहिती विहित मुदतीत व निःशुल्क पुरविली गेली नाही, असे वरील परिस्थितीवरुन स्पष्ट होते. सदर दाखला योग्य मुदतीत सादर न करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. नियमातील आवश्यक त्या बाबींची पूर्तता त्या त्या वेळीच करणे ही माहिती मागणाऱ्याची जबाबदारी आहे. ती पार न पाडणे व आयोगापुढील सुनावणीच्या वेळी संबंधित पूर्तता करणे जबाबदारपणाचे नाही. अशा प्रकारची कृती ही आयोगाची दिशाभूल करु शकते, याची गंभीर जाणीव अपीलकर्त्याने ठेवणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे:

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क व त्वरित द्यावी.

(३) केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींसाठी आवश्यक त्या अटींची पूर्तता काटेकोरपणे व त्या त्या पातळीवर करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २६.१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शंकर गुंडिबा भिसे
रा. १३०१, भिसे प्लॉट, सुभाषनगर,
बार्शी, ता. बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
सोलापूर, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर गुंडिबा भिसे, रा. १३०१, भिसे प्लॉट, सुभाषनगर, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर
श्री. राजेंद्र महादेव मदने

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर
श्री.महेश दादाराव देवकाते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १९.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १७.६.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | २९.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>बार्शीतील कँपकामी श्री. चव्हाण व त्यांचे सहकारी हे खाजगी बेकायदेशीर एजंट संजय पवार, जाधव, जोशी, मनगिरे, कुलकर्णी, कासार, शिंदे वगैरेंच्या संगनमताने परवान्यासाठी आलेल्या उमेदवारांची आर्थिक लुबाडणूक करतात याबाबत कारवाई | |

## विवेचन

प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या बार्शी शिबिरात अधिकारी व खाजगी बेकायदेशीर मध्यस्थ परवान्यासाठी आलेल्या उमेदवारांची संगनमताने आर्थिक लुबाडणूक करतात, याबाबत कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शंकर गुंडिबा भिसे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांच्याकडे केली होती. त्यात काही मध्यस्थ व परिवहन अधिकारी यांची नावे श्री. भिसे यांनी नमूद केली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून अपिलाची दखल न घेतल्याच्या कारणावरुन श्री. भिसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. भिसे यांच्या चिरंजिवाला ड्रायव्हिंग लायसन्स हवे होते. त्यासाठी मध्यस्थाने अवाजवी रक्कम सांगितली, त्यातून हा विषय उद्‌भवल्याचे उभय बाजूंनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. अपीलकर्त्याने केलेली मागणी केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत बसत नाही, तो प्रशासकीय कार्यवाहीचा विषय आहे. असे असतानाही आपण श्री. भिसे यांच्या तक्रारीची दखल घेऊन चौकशी आदि पुढील कार्यवाही केली. नागरिकांना आवश्यक असणारे अर्जांचे फॉर्मस् उपलब्ध नसल्याचे आढळून आले होते. केवळ बार्शीतच नव्हे, तर सर्वच तालुका ठिकाणी ते उपलब्ध राहतील अशी व्यवस्था केली. अधिकारी व मध्यस्थांचे संगनमत असून नागरिकांची लुबाडणूक केली जाते हा मोघम आरोप आहे. नेमक्या उदाहरणासह त्यांनी पोलिसांकडे गुन्हा नोंदविल्यास तत्काळ कार्यवाही केली जाईल, असे आपण श्री. भिसे यांना कळविले, असे अपिलीय प्राधिकारी तथा उप

प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर श्री. राजेंद्र महादेव मदने यांनी स्पष्ट केले. त्याला पुष्टी देणारी कागदपत्रे त्यांनी सादर केली. अशा प्रकारच्या तक्रारींना वाव राहू नये म्हणून शिबीर दौऱ्याच्या ठिकाणी संगणकीय प्रणालीद्वारे 'स्मार्ट कार्ड' स्वरुपामध्ये लायसन्स वितरित करण्याची व्यवस्था सोलापूर जिल्ह्यात मार्च २००८ पर्यंत पूर्णपणे कार्यान्वित होईल, असे निवेदन श्री. मदने यांनी लेखी व तोंडी केले. मध्यस्थांवर व संगनमत असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी ही आपली मागणी पूर्ण झालेली नाही, असे प्रतिपादन श्री. भिसे यांनी केले.

अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील विषय केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. तरीही अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. मदने यांनी त्यातील आशय लक्षात घेऊन आवश्यक ती कार्यवाही केली, हे प्रसंशनीय आहे. आयोग त्याची आवर्जून नोंद घेत आहे. श्री. मदने यांनी यापूर्वी अपीलकर्त्याला पाठविलेल्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे व प्रत्यक्ष सांगितल्याप्रमाणे लुबाडणुकीच्या अनुषंगाने पोलिसांकडे गुन्हा नोंदवायचा की नाही हा अपीलकर्त्याचा प्रश्न आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कार्यकक्षेतील विषय नसल्यामुळे अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. १७.१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड.अजय विजय पाटील
रा.१/१६, स्वारगेट पोलीस लाईन, पुणे-४२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता, मलनि:स्सारण प्रकल्प,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.८.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.अजय विजय पाटील
रा.१/१६, स्वारगेट पोलीस लाईन, पुणे-४२

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री.प्रशांत मधुकर वाघमारे

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता, मलनि:स्सारण प्रकल्प,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रमोद शं.निरभवणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.७.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>भैरोबा पंपिंग स्टेशन येथील मैलापाणी शुध्दिकरण प्रकल्प निर्मितीकरणासाठी एन्व्हायरो कंट्रोल असोसिएटस् (इंडिया) प्रा.लि., सुरत, गुजरात ही कंपनी व पुणे महानगरपालिका यांच्यातील कराराची साक्षांकित प्रत, कंपनीच्या संचालकांची नावे व पत्ते, कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसचा पत्ता, सदर प्रकल्प कंपनीला देण्यात आलेल्या आदेशाची प्रत, सदर प्रकल्प निर्मिती करण्यासाठी व चालवण्यासाठी कंपनीतर्फे नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या, नावे, वेतन पुस्तिका, कर्मचाऱ्यांना शासकीय नियमांप्रमाणे देण्यात आलेले भत्ते व सुविधा (इपीएफ, इएसआय) वगैरेचा तपशील, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कंपनीस देण्यात आलेल्या कालावधीचा तपशील, प्रकल्पासाठी कंपनीस देण्यात आलेल्या मोबदल्याचा तपशील. |

## विवेचन

भैरोबा नाला मैलापाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे निर्मितीकरणाचे व देखभालीचे काम करण्यासाठी एन्व्हायरो कंट्रोल असोसिएटस् (इंडिया) प्रा.लि., सुरत, गुजरात या ठेकेदाराला दिलेल्या कामाच्या संदर्भात व त्या कामावरील कनिष्ठ श्रेणी कामगारांच्या आर्थिक लाभाबाबत माहिती अपीलकर्ता ॲड.अजय विजय पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, मलनि:स्सारण प्रकल्प, पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. सातत्याने अपुरी माहिती मिळाल्यामुळे ॲड.पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. माहिती देण्याचा आदेश त्यांनी दिल्यानंतरही त्यानुसार कार्यवाही झाली नाही, म्हणून ॲड.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

भैरोबा नाला मैलापाणी शुध्दिकरण प्रकल्पाचे निर्मितीकरणाचे व देखभालीचे काम करण्यासाठी एन्व्हायरो कंट्रोल असोसिएटस् (इंडिया) प्रा.लि., सुरत, गुजरात या कंपनीला पुणे महानगरपालिकेने डिसेंबर २००१ मध्ये दिले होते. सन २००२ साली हे काम प्रत्यक्ष सुरु झाले.

डिसेंबर २००१ ते सप्टेंबर २००५ या काळातील माहिती ॲड.पाटील यांनी मागितली होती. महानगरपालिका व ठेकेदार यांच्यात झालेला करार, कामाचा आदेश, हंगामी कामगारांना दिलेले वेतन, भविष्य निर्वाह निधी, इएसआय इ.कपात व इतर लाभ दर्शविणारे वेतनपत्र व अन्य कागदपत्रे अशा स्वरुपाची माहिती ॲड.पाटील यांनी मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत काही माहिती दिली. परंतु ती अपुरी असल्याची तक्रार ॲड.पाटील यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे केली. तसेच नगर अभियंता श्री.प्रशांत वाघमारे हे संबंधित करारावर स्वाक्षरी करणारे एक घटक असल्यामुळे आपले अपील अन्य अधिकाऱ्याकडे वर्ग करावे, असा अर्जही ॲड.पाटील यांनी केला होता. ॲड.पाटील यांनी केलेल्या अपिलाची सुनावणी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता श्री.प्रशांत मधुकर वाघमारे यांनी विहित मुदतीत केली. तरीही संबंधित कंपनीकडून अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती मिळाली नाही.

एकीकडे माहितीच्या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करीत असताना ॲड.पाटील यांनी आपले सहकारी प्रतिनिधी ॲड.सचिन पलसे व ॲड.वाय.पी.हडदरे यांच्यासह अन्य मार्गानेही या विषयाचा पाठपुरावा चालू ठेवला. माहितीच्या अधिकारात ही माहिती मागतानाच त्यांनी कामगार न्यायालयातही दावा दाखल केला. संबंधित कामावरील हंगामी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन व भविष्य निर्वाह निधी आदी लाभ दिला गेलेला नाही व कायद्यानुसार 'मूळ मालक ' म्हणून या सर्व बाबींची जबाबदारी महानगरपालिकेवर असल्यामुळे महानगरपालिकेकडून ही माहिती मिळाली पाहिजे. तसेच कामगारांना न मिळालेले लाभ दिले गेले पाहिजेत, अशी ॲड.पाटील यांची मागणी होती. आपण नियमानुसार योग्य ते सर्व लाभ संबंधित कामगारांना दिले असल्याचे कंपनीने कळविले व तसे जन माहिती अधिकाऱ्यांनी ॲड.पाटील यांना कळविले.

विषय गुंतागुंतीचा व मुख्यतः कामगारांच्या आर्थिक लाभांविषयीच्या कार्यवाहीचा आहे. त्यामुळे ॲड.पाटील व त्यांचे सहकारी यांच्या समवेत महानगरपालिकेचे विकास अभियंता, नगर अभियंता, तसेच ठेकेदार यांची काही वेळा चर्चा झाली. त्यात संबंधित माहितीची कागदपत्रे ठेकेदाराने दि.३०.४.२००६ पर्यंत सादर करण्याचे ठरले. ठेकेदाराकडून माहिती उपलब्ध झाल्यावर आपणांस तातडीने सादर करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता श्री.प्रमोद निरभवणे यांनी दि.२१.४.२००६ च्या पत्रान्वये ॲड.पाटील यांना कळविले. ठेकेदाराकडून

अद्याप माहिती उपलब्ध झालेली नाही, असे त्यांनी दि.१५.५.२००६ च्या पत्रान्वये कळविले. त्यांनतर दि.३०.५.२००६ रोजी ॲड.पाटील यांनी केलेल्या अपिलाची सुनावणी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता श्री.प्रशांत वाघमारे यांनी दि.२९.६.२००६ रोजी केली. उपलब्ध असलेली माहिती ॲड.पाटील यांना द्यावी, कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने मागितलेली कर्मचाऱ्यांबाबतची माहिती संबंधित कंपनीकडून मागवून घ्यावी, अन्य माहितीच्या संदर्भातील अभिलेख पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत, असा आदेश श्री.वाघमारे यांनी दिला. तसेच 'जोपर्यंत सदर कंपनीकडून सर्व माहिती उपलब्ध होत नाही, तसेच सर्व कार्यवाही पूर्ण होत नाही तोपर्यंत त्या कंपनीची बयाणा रक्कम कंपनीला देऊ नये,' असाही आदेश त्यांनी दिला. जन माहिती अधिकाऱ्यांनी आणखी काही माहिती दि.१९.७.२००६ रोजी ॲड.पाटील यांना दिली. परंतु पूर्ण माहिती मिळाली नाही. तसेच कामगारांना कायद्यानुसार योग्य ते सर्व लाभ दिले असल्याची ठेकेदाराने दिलेली माहिती चुकीची आहे, असे सप्रमाण नमूद करुन ॲड.पाटील यांनी सर्व कागदपत्रे आयोगाला सादर केली.

आयोगाने दि.२९.६.२००७ रोजी या अपिलाची सुनावणी ठेवली होती. परंतु अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता यांनी १५ दिवसांची मुदत मागितल्यामुळे सुनावणी दि.६.८.२००७ रोजी निश्चित करण्यात आली. परंतु त्या दिवशी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित राहू न शकल्यामुळे दि.८.८.२००७ रोजी सुनावणी घेण्यात आली.

ठेकेदाराकडे काम सोपविले तरी मूळ मालक म्हणून सर्व कागदपत्रे ठेवणे व ठेकेदाराकडील संबंधित कामावरील कामगारांच्या संबंधातील कायदेशीर बाबींची पूर्तता करण्याची खबरदारी घेणे ही महापालिकेची जबाबदारी आहे, असे ऑगस्ट २००४ पासून विविध परिपत्रकान्वये महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलेले आहे. त्याच्या प्रती उभय बाजूंनी आयोगापुढे सादर केल्या. मात्र प्रत्यक्षात अशा प्रकारची अंमलबजावणी होत नसल्याचे व 'मूळ मालक ' म्हणून अशा नोंदी ठेवण्याची व संबंधित कागदपत्रांची जबाबदारी महापालिकेची आहे, याची प्रथमच या प्रकरणामुळेच जाणीव झाली. त्यानंतर तसे परिपत्रकही पुन्हा काढण्यात आले, असे श्री.वाघमारे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले.

संपूर्ण माहिती देण्याची व कामगारांचे लाभ त्यांना मिळावेत अशी कार्यवाही करण्याची महानगरपालिकेची इच्छा असून तसे प्रयत्न चालू असल्यामुळेच माहितीबाबत संबंधित ठेकेदारांशी

पत्रव्यवहार करण्यात येत आहे. तसेच त्यांचे अंतिम देयक व बयाणा अशी ४५,२०,०००/- रुपयांची रक्कम रोखून धरण्यात आली आहे, असे श्री.वाघमारे यांनी नमूद केले. पूर्ण माहिती मिळावी. म्हणजे कामगारांचे लाभ मिळण्याविषयीची कार्यवाही न्यायालयातून आपल्याला मार्गी लावता येईल, असे प्रतिपादन ॲड.पाटील व त्यांचे सहकारी यांनी केले. 'माहिती 'पेक्षा मूळ मागणी कामगारांना त्यावेळचे आर्थिक लाभ मिळावेत हीच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दि.१६.८.२००७ पर्यंत उभय बाजूंनी आपले अहवाल सादर करावेत, ठेकेदाराकडील माहिती प्राप्त करुन द्यावी व अनुषंगिक कारवाईबाबत ठेकेदाराचे निवेदन महापालिकेने घेऊन सादर करावे, असे आदेश आयोगाने दि.८.८.२००७ रोजी सुनावणीच्या वेळी दिले.

ठेकेदाराला दिलेल्या कामाच्या संदर्भात कामगारांबाबतची व अन्य संबंधित कागदपत्रे ठेवणे ही मूळ मालक म्हणून कायद्यानुसार महानगरपालिकेची जबाबदारी आहे. ठेकेदाराने याबाबतची पूर्तता केली आहे की नाही हे पाहणे हा महानगरपालिकेच्या जबाबदारीचा भाग आहे. ठेकेदाराकडून माहिती प्राप्त होत नाही, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे समर्थन रास्त ठरत नाही. संबंधित माहितीच्या अभावी कामगारांना नियमानुसार देणे आवश्यक असलेले लाभ दिले गेले की नाही व त्यांचे आर्थिक नुकसान झाले की नाही हे स्पष्ट होऊ शकत नाही, अशी या विषयातील परिस्थिती आहे. आर्थिक लाभ मिळणे-न मिळणे हा कार्यवाहीचा विषय केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. परंतु मूळ नोंदीची कागदपत्रे व अन्य माहिती मिळाल्याशिवाय त्याबाबतची निर्णयप्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेता कायद्यानुसार आवश्यक असलेली माहितीची कागदपत्रे न ठेवणे/ त्याबाबत खबरदारी न घेणे हे मुळापासूनच माहिती नाकारणे ठरते. या पार्श्वभूमीवर ठेकेदाराची बयाणा रक्कम व अंतिम देयकाची रक्कम महानगरपालिकेने रोखून ठेवली, हे माहिती पुरविण्याच्या संदर्भातील प्रशासकीय कार्यवाहीचा भाग म्हणून योग्य ठरते.

अपेक्षित माहितीचा अंतिम उपयोग लक्षात घेता ती प्राप्त झाल्यास कामगारांना देय असलेल्या आर्थिक लाभाचा विचार करण्याचे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आयोगापुढील सुनावणीत कबूल केले. माहिती व अनुषंगिक कार्यवाही याबाबत ॲड.पाटील व त्यांचे सहकारी ॲड.पलसे व ॲड.हडदरे हे आपले प्रतिनिधी करतील तो निर्णय आपल्याला मान्य असेल, असे निवेदन संबंधित कामगारांनीही आयोगापुढे उपस्थित राहून केले. महापालिका अधिकाऱ्यांचा प्रस्ताव

ॲड.पाटील यांनी मान्य केला. उभय बाजूंनी त्यासाठी अवधी देण्याची विनंती आयोगाला केली. मुळातील माहितीचे पुढील कार्यवाहीच्या दृष्टीने असलेले महत्त्व विचारात घेऊन आयोगाने ती मान्य केली. मात्र माहिती देण्यात होत असलेल्या या अक्षम्य दिरंगाईला केवळ जन माहिती अधिकारी अथवा अन्य विशिष्ट अधिकारी जबाबदार नसून सार्वजनिक प्राधिकरण म्हणून महानगरपालिकेची ती जबाबदारी आहे, संबंधित कामाच्या संदर्भात महानगरपालिकेचाच एक भाग ठरणाऱ्या ठेकेदाराकडून महानगरपालिकेने रोखून धरलेल्या रकमेतील रु.२५०००/- शास्ती म्हणून जमा करावी लागेल, असे आयोगाने त्याच वेळी आदेशित केले.

मूळ माहिती व त्यावर आधारित कार्यवाहीच्या पूर्ततेची अनुषंगिक माहिती देण्यासाठी मुदत देण्याची जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची विनंती, प्रश्नाचे स्वरुप व रोजंदारीवरील कामगारांच्या हिताचा सामाजिक संदर्भ लक्षात घेऊन आयोगाने मान्य केली.

संबंधित कामगार व ठेकेदार यांच्याबरोबर चर्चा चालू असल्याचे उभय बाजू दरम्यानच्या काळात आयोगाला कळवीत राहिल्या. कंपनी व संबंधित कामगार यांच्यात दि.२९.१०.२००७ रोजी झालेला समजुतीचा करारनामा जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता श्री.प्रमोद शं.निरभवणे व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता श्री.प्रशांत मधुकर वाघमारे यांनी दि.२१.११.२००७ रोजी आयोगाला सादर केला. त्यात नमूद केल्यानुसार ३९ कामगारांना किमान रु.१०,०००/- ते कमाल रु.५२,०००/- एकूण १०,५०,०००/- आर्थिक लाभातील फरकाची रक्कम देण्यात आल्याचा अहवाल संबंधितांच्या स्वाक्षरीसह उभय बाजूंतर्फे नंतर आयोगाला सादर करण्यात आला.

ॲड.अजय विजय पाटील व त्यांचे सहकारी यांनी कामगार हिताचा हा प्रश्न केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या माध्यमातून धसाला लावला. जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता श्री.प्रमोद शं. निरभवणे व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता श्री.प्रशांत मधुकर वाघमारे यांनी आधारभूत माहितीची पूर्तता करुन अनुषंगिक कार्यवाही केली, व माहिती मागण्यामागील मूळ कारणाचे निराकरण करुन माहितीबाबतची तर्कसंगत परिपूर्ती केली, याची आयोग विशेषत्वाने नोंद घेत आहे.

वरील परिस्थिती विचारात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) माहिती न दिल्याबद्दल ठेकेदाराकडून रु.२५,०००/- शास्ती वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता श्री.प्रशांत मधुकर वाघमारे यांनी करुन तसा पूर्तता अहवाल दि.१०.१.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २९.१२.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. भारत दत्तात्रय गुंड
मु.पो.शिरापूर (सो), ता. मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
प्रादेशिक व्यवस्थापक,
राज्य परिवहन महामंडळ, पुणे प्रदेश, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ, सोलापूर विभाग
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. भारत दत्तात्रय गुंड, मु.पो.शिरापूर (सो), ता. मोहोळ, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक व्यवस्थापक,
राज्य परिवहन महामंडळ, पुणे प्रदेश, पुणे श्री. अशोक एकनाथ कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन मंडळ,
सोलापूर विभाग, जि. सोलापूर श्री. राजेंद्र चंद्रोजी पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ४.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २९.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १९.८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १२.९.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** पंढरपूर येथे असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या चंद्रभागानगर बसस्थानकाच्या जागेचा वापर व त्याअनुषंगाने माघी यात्रा २००५ व कार्तिकी यात्रा २००५ मध्ये या जागेवर गुरांचा बाजार भरविणाऱ्या शेतकऱ्यांकडून जागाभाडे वसुली करण्यात आली आहे काय, असल्यास त्याची कारणे, वसूल केलेले जी-१२ पावती पुस्तकातील पावतीच्या किमान १० छायांकित प्रती, माघ यात्रा २००५ चंद्रभागा नगर पंढरपूर येथे जनावरे जागेच्या भुईभाड्यापोटी जमा केलेले अकौंट हेड, व वसुली संदर्भात शासन नियमाच्या आदेशाची प्रत, जनावरांच्या बाजारात झालेली घाण स्वच्छ करणेसाठी किती खर्च केला, रोजंदार कर्मचाऱ्यांची नावे, पत्ते, जनावरांच्या भाडे वसुली कामासाठी नियोजन शाखेतील किती सिव्हिल इंजिनियर सहभागी होते, त्यांची नावे व पत्ते इत्यादी माहिती | |

## विवेचन

पंढरपूर, ता. पंढरपूर येथे असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या चंद्रभागानगर बसस्थानकाच्या जागेचा वापर व त्याअनुषंगाने माघी यात्रा २००५ व कार्तिकी यात्रा २००५ मध्ये या जागेवर गुरांचा बाजार भरविणाऱ्या शेतकऱ्यांकडून जागाभाडे वसुली करण्यात आली आहे काय, असल्यास त्याची कारणे, वसूल केलेल्या रकमेच्या जी-१२ पावती पुस्तकातील पावतीच्या किमान दहा छायांकित प्रती इत्यादी दहा मुद्यांची माहिती अपीलकर्ता श्री. भारत दत्तात्रय गुंड यांनी जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. त्यांनी दहापैकी दोनच मुद्यांची खरी माहिती दिली व अन्य मुद्यांबाबत दिशाभूल करणारी माहिती दिली, अशा कारणावरून श्री. गुंड यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे प्रदेश, पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कनिष्ठ अधिकाऱ्यांची पाठराखण करत जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरविला, असे कारण नमूद करून श्री. गुंड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

चंद्रभागानगर बसस्थानकावरील भरलेला जागेचा टॅक्स सोडून ऊर्वरित जागेवरील जनावरांच्या मालकाकडून वसूल केलेल्या रक्कमा या बेकायदेशीर आहेत. हे राज्य परिवहन प्रशासनाने मान्य करून या रकमा परत दिल्या पाहिजेत, अशी श्री. गुंड यांची मुख्य मागणी आहे. लेखी निवेदनाद्वारे, तसेच आयोगापुढील सुनावणीत त्यांनी ती मांडली. शेतकरी संघटनेतर्फे हा प्रश्न महामंडळाच्या वरिष्ठांपुढे व लोकशाही दिनात जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे विविध तक्रार अर्जांद्वारे शेतकरी संघटना, सोलापूर जिल्हा यांनी मांडला होता, असे श्री. गुंड, तसेच अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे प्रदेश, पुणे श्री. राजेंद्र चंद्रोजी पाटील यांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये नमूद केले आहे.

माघी यात्रा २००५ मध्ये रक्कम वसूल करण्यात आली तरी सन २००६ मध्ये रक्कम वसुली केलेली नाही, भुईभाडे घेतलेले नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला दिलेल्या उत्तरात नमूद केले आहे व श्री. गुंड यांच्या सर्व मुद्यांना उत्तर दिले आहे. जागा वापरणावळ रक्कम वसूल करण्याचे कृत्य कायदेशीर असून याबाबत विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, सोलापूर यांनी परिपत्रक प्रसारित केले असून त्याची प्रत आपल्या कार्यालयात उपलब्ध आहे, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलावर दिलेल्या निर्णयात नमूद केले आहे. तहसीलदार, पंढरपूर यांनी अशी जागा वापराला व पर्यायाने वसुलीला आक्षेप घेतल्यानंतर पुढील काळात वसुली केलेली नाही. म्हणजेच मूळ वसुली बेकायदेशीर ठरते व ते प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे प्रदेश, पुणे यांनी मान्य केले आहे, असे श्री. गुंड यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. परंतु प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे यांनी तसे कधीही मान्य केलेले नाही, असे विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, सोलापूर यांनी स्पष्ट केले. तसेच तहसीलदार यांच्या आक्षेपांना महामंडळाने उत्तर दिले असून तहसीलदार, पंढरपूर यांना ते योग्य वाटल्यामुळे याबाबत पुन्हा पत्रव्यवहार झालेला नाही, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्याच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही अपिलाची दखल घेतलेली आहे. मात्र जागा वापरणावळ रक्कम वसूल करण्याच्या

संदर्भातील विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, सोलापूर यांनी प्रसारित केलेल्या परिपत्रकाची प्रत कार्यालयात उपलब्ध आहे, असे कळविण्याऐवजी ती अपीलकर्त्यास पुरविणे आवश्यक होते.

शेतकऱ्यांकडून घेतलेली रक्कम कायदेशीर, की बेकायदेशीर हा यातील मुख्य मतभेदाचा प्रश्न आहे. याचा निर्णय करणे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही, तसेच शेतकऱ्यांची रक्कम परत करण्या - न करण्याचा विषय हा या कायद्याच्या कक्षेबाहेरील विषय आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपीलकर्त्याची मूळ मागणी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्यामुळे अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. जागा वापरणावळ रक्कम वसूल करण्याच्या संदर्भातील जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, सोलापूर यांनी प्रसारित केलेल्या परिपत्रकाची छायांकित प्रत त्यांनी अपीलकर्त्यास त्वरित निःशुल्क उपलब्ध करून द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १५.१२.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विनोद लक्ष्मण सावंत
मु.पो.व्यंकटनगर, अकलूज, ता.माळशिरस,
जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार माळशिरस,
ता. माळशिरस, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
निवासी नायब तहसीलदार, माळशिरस,
ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६४ / सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.८.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.९.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-यानें निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००६ |

६ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे अकलूज येथील सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानातील माहे मार्च व जुलै २००६ मधील गोदामातून दुकानदाराने उचललेला माल, त्याबाबत स्टॉक बुक झेरॉक्स (दुकानदार), पावत्यांची झेरॉक्स, ग्राहकांचे सही व अंगठा घेतलेले रजिस्टर झेरॉक्स प्रती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विनोद लक्ष्मण सावंत यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस यांच्याकडे अकलूज येथील सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानांच्या संदर्भातील माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर मागणी करुनही मागितलेली माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार माळशिरस यांच्याकडे अपील केले होते. परंतु याबाबत कोणतीही माहिती न मिळाल्याने अपीलकर्त्याने द्वितीय अपील या कार्यालयाकडे सादर केले होते. या अपिलाच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाने संबंधितांना याबाबत दि. २३.१०.२००७ रोजीचे पत्रान्वये विचारणा केली असता श्री. सावंत यांनी अपिलाच्या अनुषंगाने संबंधित प्रकरणी अपेक्षित असलेली माहिती आपल्याला प्राप्त झालेली असल्याने सदर अपील निकाली काढण्यात यावे, असे आयोगास दि. ७.११.२००७ रोजी सादर केलेल्या निवेदनाद्वारे लेखी कळविले आहे. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनाही कळविले आहे. संपूर्ण माहिती मिळाल्याने अपीलकर्त्याची आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही. याबाबत अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस यांचेकडूनही लेखी निवेदन दि. ७.११.२००७ रोजी आयोगास प्राप्त झाले आहे.

वरील विवेचन विचारात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १५.१२.२००७

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नामदेव शामराव नालंदे
व्हिल कॉलनी, बारामती,
ता. बारामती, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे - ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
चासकमान प्रकल्प विभाग, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०१ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २०.७.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १.८.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | २५.९.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>सन २००० ते २००६ या कालावधीत चाऱ्यांच्या कामाच्या निविदा, टेंडर व बिलाच्या अनुषंगाने आवश्यक माहिती पत्राच्या प्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नामदेव शामराव नालंदे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, चासकमान प्रकल्प, विभाग पुणे यांच्याकडे एकूण ७ मुद्यांबाबत माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी रु. १७,४००/- शुल्क भरणा करण्याबाबत सांगितले असतानाही अपीलकर्त्याने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यानंतर आवश्यक माहिती न मिळाल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने दि. २२.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांकडून यासंबंधात आयोगाने वस्तुस्थितीबाबत विचारणा केली. अपीलकर्ता श्री. नालंदे यांनी आपली आर्थिक क्षमता नसल्याने आपल्याला लेखी माहितीची आवश्यकता नसून आपले अपील निकाली काढावे, असे दि. २२.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे यांनी दि. १९.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला तसा अहवाल सादर केला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २६ .१२.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर, पुणे १

श्री.विकास भिमराव गायकवाड
मु.पो.वडापुरी, ता. इंदापूर, जि.पुणे- ४१३ १०६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, पुणे उत्तरवादी
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५

**जन माहिती अधिकारी** तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था इंदापूर,
ता. इंदापूर, जि. पुणे.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४३/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.९.२००७ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५
श्री. सुनील देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, इंदापूर,
ता. इंदापूर, जि. पुणे श्री. गणेश कौटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.८.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

इंदापूर तालुक्यातील नोंदणीकृत सावकारांची नावे, त्यांनी किती व कोणाला कर्जवाटप केले, कर्जाचा व्याजदर काय, तारण वस्तूंचा तपशील. तसेच विनय नागरी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची नावे, नोंदणी प्रमाणपत्रांच्या व नोंदणीसाठी दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती, मासिक बैठकीचे कार्यवृत्तांत, व संचालकांना देण्यात आलेल्या अजेंडा बुकाच्या व त्यांनी केलेल्या सह्यांच्या सत्य प्रती, कर्जवाटप करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे व माहिती, सूचक व अनुमोदकाची नावे इत्यादी

## विवेचन

इंदापूर तालुक्यातील नोंदणीकृत सावकारांची नांवे, त्यांनी केलेले कर्जवाटप, व्याजाचा दर, तारण वस्तू, तसेच विनय नागरी पतसंस्थेच्या संचालक व पदाधिकाऱ्यांची नांवे, नोंदणीविषयक कागदपत्रांच्या प्रती, मासिक बैठकीच्या कार्यवृत्तांताच्या प्रती, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालय, इंदापूर या कार्यालयात आलेल्या तक्रारी अर्जांचा आणि महाराष्ट्राच्या व केंद्रिय माहितीच्या अधिकार कायद्याखाली आलेल्या अर्जांच्या व त्यावर दिलेल्या माहितीच्या प्रती, तक्रारी असलेल्या व बंद पडलेल्या पतसंस्थांची व त्यावर केलेली कार्यवाही इ. माहिती अपीलकर्ता श्री.विकास भीमराव गायकवाड यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, इंदापूर यांच्याकडे मागितली होती. सन २००२ ते मार्च २००६ अखेरच्या काळातील ही माहिती होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी नोंदणीकृत सावकारांची यादी दिली व व्याजदराबाबत माहिती कळविली. सावकारांनी केलेल्या कर्जवाटपाबाबतची माहिती संबंधित अभिलेखाचे अवलोकन करुन घ्यावी, असे कळविले. विनय नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची यादी, नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत इ. माहिती पुरविली, मात्र मासिक सभेचे कार्यवृत्तांत वगैरे माहिती त्या संस्थेकडे असून आपल्या कार्यालयात उपलब्ध नसते, त्यामुळे ती माहिती त्यांच्याकडून मिळवावी, असे कळविले. माहितीच्या अधिकाराखालील अर्ज, बंद पडलेल्या पतसंस्था इ. माहिती ही एकूण ११०८ पानांची असून २२१६/-रुपये शुल्क भरण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.गायकवाड यांना

कळविले. त्यानंतर श्री.गायकवाड यांनी आपण दारिद्र्यरेषेखाली असून माहिती मोफत मिळावी अशी मागणी केली. मूळ अर्जात आपण दारिद्र्यरेषेखाली असल्याचा पुरावा श्री.गायकवाड यांनी दिलेला नव्हता. श्री.गायकवाड यांनी जन माहिती अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुध्द अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते फेटाळले. श्री.गायकवाड यांनी आपण दारिद्र्यरेषेखाली असल्याचे पुरावे सादर केल्यानंतर निःशुल्क माहिती देण्याच्या अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना निशुःल्क माहिती दिली. दारिद्र्यरेषेखाली असल्याचा पुरावा देऊनही शुल्क आकारणी केली, तसेच अपिलाची सुनावणी वेळेत केली नाही, म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई करुन आपल्याला नुकसानभरपाई मिळावी, अशा मागणीसाठी श्री.गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्या कार्यालयाकडील सर्व माहिती देण्यात आली, पतसंस्थांची माहिती त्या संस्थेकडूनच घेणे अपेक्षित आहे, तसेच श्री.गायकवाड यांनी मूळ अर्जासोबत व स्मरणपत्रातही दारिद्र्यरेषेखाली असल्याचे पुरावे दिलेले नाहीत. शुल्क कळविल्यानंतर त्यांनी तसा दाखला पाठविला. त्यानंतर त्यांना माहिती विनाशुल्क दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था व सावकाराचा सहाय्यक निबंधक कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती, इंदापूर, जि.पुणे श्री.गणेश कौटे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था श्री.सुनील देशमुख यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

श्री.गायकवाड हे 'रिपब्लिक न्यूज' या साप्ताहिकाचे संपादक व मालक असून त्यांच्याकडे भ्रमणध्वनीही आहे. सन १९९७-९८ च्या दारिद्र्यरेषेखालील सर्वेक्षण यादीत एकत्र कुटुंबप्रमुख म्हणून त्यांच्या वडिलांचे नाव समाविष्ट असल्याचा दाखला ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वडापुरी, ता.इंदापूर, जि.पुणे यांनी दि.१.६.२००५ रोजी दिला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यमान परिस्थितीत दारिद्र्यरेषेखालील सवलतीचा लाभ आपण घ्यावा का, याचा विचार अपीलकर्त्याने केला पाहिजे. तसेच दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्या नोंदणीसाठी शासनाने सन २००६ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार दिल्या जाणाऱ्या दाखल्यांचीही पडताळणी होणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) संबंधित विभागातील दारिद्र्यरेषेखालील दाखल्यांबाबतची माहिती देणारा अहवाल उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग, बारामती यांनी दि.३०.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ११.१२.२००७**

प्रत::उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग, बारामती, जि.पुणे यांना आदेशात दिलेल्या सूचनांप्रमाणे कारवाईसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. कैलास केशव ऊर्फ आप्पा चोंधे,
मु.पो.भुगाव, ता. मुळशी, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार मुळशी, ता.मुळशी, जि. पुणे — उत्तरवादी
तत्कालीन अपिलीय प्राधिकारी

**जन माहिती अधिकारी** तथा
निवासी नायब तहसीलदार, मुळशी,
ता. मुळशी, जि. पुणे
तत्कालीन जन माहिती अधिकारी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७०+४७३+४७६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. कैलास केशव ऊर्फ आप्पा चोंधे
मु.पो.भुगाव, ता. मुळशी, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार मुळशी, ता.मुळशी, जि. पुणे
श्री. अे. डी. शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी,
ता. मुळशी, जि. पुणे श्री. हेमंत पी. निकम

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
| --- | --- | --- | --- | --- |
| ४७० / पुणे | दि. २१.१.२००६ | दि. -- | दि. १६.३.२००६ | दि. |
| ४७३/ पुणे | दि. १.३.२००६ | दि. -- | दि. २४.४.२००६ | दि. -- |
| ४७६ / पुणे | दि. १०.२.२००६ | दि. -- | दि. १६.३.२००६ | दि. -- |

अपील क्रमांक ४७०

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

तहसील कार्यालयाचे नूतनीकरण, नूतन इमारत आवारातील पोलिस स्टेशनची नवीन इमारत, जुन्या इमारतीची डागडुजी, या सर्व कामाचे टेंडर कधी प्रकाशित करण्यात आले, दैनिकाचे नाव, दिनांक, किती टेंडर आले होते, संपूर्ण कामांचा खर्चाचा तपशील, काम कोणत्या संस्थेने अथवा ठेकेदाराने केले त्याचे नाव व पत्ता.

<u>विवेचन</u>

पौड तहसील कार्यालयाच्या नूतनीकरणाच्या कामाचा तपशील, तसेच तहसील कार्यालय आवारातील नवीन पोलिस ठाण्याच्या इमारतीच्या कामाबाबतचा तपशील, संबंधित कामाचे टेंडर; त्याचा खर्च; ठेकेदाराचे नाव इत्यादीसह मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.कैलास केशव ऊर्फ आप्पा चौंधे यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पौड), मुळशी, ता. मुळशी जि. पुणे यांच्याकडे केली होती. परंतु या अर्जाची दखल घेतली गेली नाही, म्हणून श्री. चौंधे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार मुळशी, ता. मुळशी यांच्याकडे अपील केले. या अपिलाची कोणत्याही प्रकारे दखल घेतली गेली नाही, म्हणून श्री. चौंधे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मुळशी तहसील कार्यालयाचे नूतनीकरण व आवारातील अन्य इमारतींची कामे करण्यात आली असून त्याबाबतचा तपशील दिला जात नाही, अधिकृत ठेकेदारांमार्फत ते काम केले गेले

ल्यास निविदा व अन्य तपशील उपलब्ध असला पाहिजे, नसल्यास अन्य ठेकेदारामार्फत काम ते गेले का हे नागरिकांना कळले पाहिजे, असे प्रतिपादन श्री. चौंधे यांनी आयोगापुढील सुनावणीत त्रे. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संदश शिर्के व अपिलीय प्राधिकारी श्री. पांडुरंग मगदूम ची बदली झाली असल्यामुळे आपण उपस्थित राहत असलो तरी मूळ अर्ज व अपील आपल्या ार्यकाळातील नाही, असे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, मुळशी श्री. हेमंत पी. कम व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मुळशी श्री. अे.डी. शिंदे यांनी लेखी व तोंडी स्पष्ट ले. तसेच तत्कालीन तहसीलदार, मुळशी श्री. पांडुरंग मगदूम यांनी सेवाभावी संस्था, व्यक्ती ांची मदत घेऊन सर्वसामान्य नागरिकांच्या उपयोगासाठी चांगली वास्तू निर्माण केली असल्याचे श्री. अे. डी. शिंदे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री. शिर्के दि. ३.५.२००६ पर्यंत व श्री. मगदूम दि. २७.४.२००६ पर्यंत त्या पदावर कार्यरत होते. मात्र श्री. चौंधे यांना माहिती दिली गेली नाही, तसेच त्यांच्या अपिलाच्या संदर्भात श्री. मगदूम यांनी त्यांच्या कार्यकालात कोणतीही कार्यवाही सुरु केल्याचे दिसून आले नाही, असेही श्री. शिंदे यांनी नमूद केले आहे. दि. १९.५.२००६ रोजी श्री. चौंधे यांनी अपिलाची प्रत आपल्याला सादर केल्यानंतर आपण सुनावणी घेऊन दि. २६.७.२००६ रोजी निर्णय दिला, असे त्यांनी सांगितले. आपण श्री. चौंधे यांना दोन पत्रे पाठविली होती, असे श्री. शिर्के यांनी त्या सुनावणीत सांगितले. परंतु ही पत्रे कशी पाठविली, अर्जदाराला मिळाली की नाही, याचा कोणताही खात्रीशीर पुरावा मिळाला नाही, असेही आपल्या निकालपत्रात आपण स्पष्ट केले असल्याचे श्री. ए. डी. शिंदे यांनी सांगितले. श्री. शिंदे यांनी अपील फेटाळले. दरम्यान दि. ८.६.२००६ रोजी श्री. चौंधे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले होते.

श्री. चौंधे यांनी मागितलेली माहिती केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या 'माहिती' या व्याख्येत बसत नाही व ही माहिती देऊनसुध्दा व्यापक जनहित साध्य होणार नाही अशी आपली खात्री झाली आहे, त्यामुळे आपण अपील फेटाळल्याचे श्री. शिंदे यांनी निकालपत्रात म्हटले आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिर्के व अपिलीय प्राधिकारी श्री. मगदूम यांनी आपली जबाबदारी योग्य रीत्या पार पाडली नाही, हे विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी

यांच्या व अपीलकर्त्याच्या निवेदनातून स्पष्ट होते.

संबंधित माहिती अपीलकर्त्यास १० दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना तसे लेखी कळवून त्याची प्रत व त्यांनी अपीलकर्त्याला उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची प्रत आयोगाला सादर करावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार श्री. शिंदे यांनी त्याच दिवशी श्री. शिर्के व श्री. मगदूम यांना तसे लेखी कळविले. श्री. शिर्के यांनी दि. १७.९.२००७ रोजी, तर श्री. मगदूम यांनी दि. १८.९.२००७ रोजी श्री. चौंधे यांना ही माहिती पाठवून अनुक्रमे दि. १८.९.२००७ व दि. १९.९.२००७ रोजी आयोगाला तसे निवेदन माहितीच्या प्रतीसह पाठविले आहे. श्री. शिर्के यांनी दि. २९.५.२००६ रोजी अपिलीय प्राधिकाऱ्यांना हीच माहिती पाठविली असल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. ही माहिती अर्ज केल्यापासून तीस दिवसांच्या आत अपीलकर्त्याला देणे शक्य होते.

श्री. मगदूम यांनी प्रशासकीय कामकाज करीत असताना मुळशी तहसील कार्यालयाच्या नूतनीकरणाचे काम खाजगी सेवाभावी संस्था व व्यक्ती यांच्या मदतीने करुन घेऊन उल्लेखनीय कामगिरी केली, मात्र श्री. चौंधे यांनी मागणी केलेली कोणतीही माहिती तहसील कार्यालयाच्या अभिलेखकक्षात उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही, असे श्री. शिंदे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. ते लक्षात घेता संबंधित माहिती श्री. मगदूम यांच्याकडेच असल्यामुळे त्यांनी ती देणे आवश्यक होते. म्हणून ते केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ च्या कलम ५(५) अन्वये जन माहिती अधिकारी ठरतात. या अर्थाने जन माहिती अधिकारी म्हणून व पदानुसार अपिलीय प्राधिकारी म्हणून या दोन्ही दृष्टींनी त्यानी जबाबदार पार पाडलेली नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संदेश शिर्के व तहसील कार्यालयाच्या नूतनीकरणा-संदर्भातील माहिती ज्यांनी देणे आवश्यक होते आणि म्हणून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(५) अन्वये जन माहिती अधिकारी ठरतात असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी

श्री. पांडुरंग मगदूम यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही, कार्यवाही केलेली नाही. या बाबतचा खुलासा दि. २०.१२.२००७ पर्यंत त्यांनी आयोगाला सादर करावा, त्यानंतर शास्तीबाबतचा निर्णय आयोग घेईल.

अपील क्रमांक ४७३ + ४७६ / पुणे

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

मौजे भालगुडी, ता. मुळशी, येथील गट क्र. ११७० या जमिनीमध्ये सुरु असलेल्या दगडांच्या खाणीसाठी कोणत्या शासकीय कार्यालयामार्फत परवानगी देण्यात आली आहे, परवानगी देण्यात आली असल्यास त्याची प्रमाणित प्रत, परवानगी दिली नसल्यास खात्याकडून बेकायदेशीर खाणीवर कोणती कारवाई करण्यात आली त्याच्या तारखेसह तपशील

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ नुसार कार्यालयात कोणकोणती कार्यवाही केली गेली याची तपशीलवार माहिती

**<u>विवेचन</u>**

१. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ नुसार मुळशी तहसील कार्यालयात केलेली कार्यवाही २. मौजे भालगुडी, ता. मुळशी, येथील गट क्र.११७० मध्ये सुरु असलेल्या दगडाच्या खाणीना परवानगी दिली असल्यास त्याची प्रत व नसल्यास केलेली कारवाई, अशी माहिती अपीलकर्ता श्री. कैलास केशव ऊर्फ आप्पा चौंधे यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी, ता. मुळशी (तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संदेश शिर्के ) यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती न मिळाल्यामुळे श्री. चौंधे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार मुळशी, ता. मुळशी, जि. पुणे (तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. पांडुरंग मगदूम - अपील क्र.४७६, अपिलीय प्राधिकारी श्री. ए.डी. शिंदे - अपील क्र.४७३ ) यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपिलाची दखल न घेतल्यामुळे श्री. चौंधे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत.

अनुक्रमे दि. १७.५.२००६ व दि. ८.६.२००६ रोजी ही अपिले केली होती. त्यानंतरच्या काळात आपल्याला माहिती मिळाली असून आपली तक्रार राहिलेली नाही व शास्तीची मागणी नाही, असे श्री. चौंधे यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. हे निवेदन लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ६.१२.२००७

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१) श्री.कबीर किसन बिवाल
४२२, सोमवार पेठ, पुणे-१

(२) श्री.मेवालाल बाबू चव्हाण
४२३, सोमवार पेठ, पुणे ... अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (शिक्षण)
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक (सहकार)
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.९.२००७ |

३. **उपस्थित** श्री.मेवालाल बाबू चव्हाण
४२३, सोमवार पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (शिक्षण)
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
श्री.एल.एस.माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक (सहकार)
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
श्री.आर.बी.कुमावत

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.४.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** <br><br> मेहतर बाल्मिकी समाजाला शैक्षणिक पात्रतेप्रमाणे नोकऱ्या व उद्योगधंद्यात प्राधान्य देऊन सामाजिक पुनर्वसन करण्याच्या संदर्भात पागे समितीच्या अहवालानुसार शासनाने केलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली जात नाही व प्रलंबित प्रकरणांबाबत कार्यवाही केली जात नाही, अशा ७१ मुद्यांची माहिती. |
|---|---|

## विवेचन

मेहतर बाल्मिकी समाजाला शैक्षणिक पात्रतेप्रमाणे नोकऱ्या व उद्योगधंद्यात प्राधान्य देऊन सामाजिक पुनर्वसन करण्याच्या संदर्भात पागे समितीच्या अहवालानुसार शासनाने केलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली जात नाही व प्रलंबित प्रकरणांबाबत कार्यवाही केली जात नाही, या संदर्भात मेहतर बाल्मिकी सामाजिक न्यायप्राप्ती संघर्ष समिती, पुणे शहर/ जिल्हा यांच्या वतीने श्री.मेवालाल बाबू चव्हाण व श्री.कबीर किसन बिवाल या सदस्यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (सहकार) समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली अर्ज केला होता. पागे समितीच्या अहवालाच्या स्पष्टीकरणापासून, 'माणूस किती दिवस उपाशी राहू शकतो,' 'नोकरीचा प्रश्न हा त्या दलित पीडिताचा व त्याच्या कुटुंबियांचा अत्यावश्यक मूलभूत भाकरीचा प्रश्न आहे, हे विधान आपल्या कार्यालयाला मान्य आहे किंवा नाही' अशा प्रश्नांपर्यंत विविध ७१ मुद्यांची माहिती त्यात मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले त्याचे उत्तर अमान्य असल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.बिवाल व श्री.चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक (शिक्षण) समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवून त्यांनी अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री.बिवाल व श्री.चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मेहतर समाजाच्या लोकांना सामाजिक न्याय देण्याविषयी शासनाकडे आपल्या समितीने अनेक निवेदने दिली आहेत,- परंतु शासन आदेशाप्रमाणे कार्यवाही केली जात नाही, अशी अपीलकर्त्यांची मुख्य तक्रार आहे. आयोगापुढे ती त्यांनी विस्ताराने मांडली. त्यांची मागणी कारवाईशी निगडीत असून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये 'माहिती ' या

सदरात समाविष्ट होत नाही, देय माहिती देण्यात आली आहे. परंतु तर्कावर आधारित प्रश्नांची उत्तरे अथवा मतप्रदर्शन करणे, तसेच कार्यवाहीबाबतचा निर्णय घेणे 'माहिती' या सदरात समाविष्ट होत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (सहकार) श्री.आर.बी.कुमावत व अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक (शिक्षण) श्री.एल.एस.माळी यांनी प्रतिपादन केले. ते रास्त आहे. प्रश्न सामाजिक न्यायाचा आहे, हे अपीलकर्त्याचे प्रतिपादन योग्य असले, तरी त्याविषयीची कार्यवाही ही केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. योग्य त्या प्रशासकीय मंचाकडे त्यांनी हा विषय मांडणे उचित ठरेल.

आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नसल्यामुळे अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(२) प्रश्नाचे स्वरुप सामाजिक न्यायाशी निगडीत आहे, परंतु प्रशासकीय कार्यवाहीचा हा विषय असल्यामुळे मेहतर बाल्मिकी सामाजिक न्यायप्राप्ती संघर्ष समितीचे सदस्य व संबंधित अधिकारी यांनी एकत्रित चर्चेने त्याचा विचार करणे व अनुषंगिक माहिती अपीलकर्त्यांना उपलब्ध करुन देणे योग्य ठरेल.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. १०.१२.२००७